**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण**
**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१**

Email Id – jdhepune@gmail.com Website – www.jdhepune.info

फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

जा.क्र. एनएसपी पोर्टल-२०२१-२२/(८४४६/२१)/शिष्यवृत्ती/ 4181 दिनांक : १८.११.२०२१

**अत्यंत महत्वाचे / तात्काळ**

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
कनिष्ठ / वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा.

**विषय : - उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्र शासन पुरस्कृत दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजनेची NSP पोर्टलवरुन सन २०२१-२२ साठी प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत..**

संदर्भ : - मा. शिक्षण संचालनालयाचे ईमेलद्वारे प्राप्त पत्र क्र. उशिसं/शिष्य/केंद्रपुरस्कृत दिव्यांगजन/२०२१-२२/१३३३१ दि १५.११.२०२१.

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, केंद्र शासनाच्या एन.एस.पी. पोर्टलद्वारे उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येते. सदर शिष्यवृत्ती ११ वी, १२ वी, पोस्ट मॅट्रिक डिप्लोमा / सर्टीफिकेट पदवी, पदव्युत्तर डीग्री / डिप्लोमा व सर्टीफिकेट या अभ्यासक्रमासाठी देण्यात येते. सदर शिष्यवृत्तीसाठी महाराष्ट्र राज्यासाठी नवीन (Fresh) शिष्यवृत्तीसाठी १८७९ संच निर्धारित केलेले आहेत.

सन २०२१-२२ करीता दि. १८ ऑगस्ट, २०२१ पासून एनएसपी पोर्टलवरुन शिष्यवृत्तीसाठी अर्ज मागविण्याची प्रक्रिया सुरु झालेली असून, विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत ३० नोव्हेंबर, २०२१ अशी आहे. संचालनालयाच्या www.dhepune.gov.in संकेतस्थळावर आणि या कार्यालयाच्या www.jdhepune.info या संकेतस्थळावर सूचना देऊनही ऑनलाईन अर्जांच्या संख्येत वाढ होताना दिसून येत नाही. तसेच याबाबत केंद्रशासन व राज्य शासनाकडून विविध आढावा बैठकीमध्ये सर्व पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अर्ज भरणेबाबत कळविले आहे. जास्तीत जास्त पात्र विद्यार्थ्यांनी या शिष्यवृत्तीचे लाभ घ्यावा याकरीता या शिष्यवृत्ती योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात यावी. तसेच यासंबंधित केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास त्वरीत सादर करण्यात यावा.

NSP Portal द्वारे सर्व महाविद्यालय / विद्यापीठ / संस्थांना Adhar Base लॉगीन करण्याची सुविधा देण्यात आलेली आहे. तसेच सन २०२१-२२ पूर्वी महाविद्यालयांनी KYC पूर्ण केले आहेत त्यांनी त्यांच्या NSP Portal वर Institute लॉगीन मध्ये आधार व मोबाईल नंबर नोंदणी (Register) करणे आवश्यक आहे. तसेच सन २०२१-२२ साठी नवीन महाविद्यालय / विद्यापीठ / संस्थांच्या KYC करण्याबाबतची प्रक्रिया NSP Portal च्या Home Page वरील Services Option वर Institute KYC Registration Form मध्ये देण्यात आलेली आहे. सदर Form भरल्यानंतर State Nodal Officer द्वारे सदरच्या भरलेल्या तपशीलाची पडताळणी करुन त्यांना ऑनलाईन पध्दतीने युजर आयडी व पासवर्ड मिळेल.

केंद्रशासन पुरस्कृत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक योजनेपासून एकही पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीबाबतची माहिती न मिळाल्यामुळे शिष्यवृत्तीपासून वंचित राहील्या त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य, विद्यापीठामधील विद्यार्थ्यांबाबत संबंधित विद्यापीठाचे कुलसचिव यांची राहील. याची सर्व महाविद्यालय / संस्था / विद्यापीठांनी गांभीर्याने नोंद घ्यावी.

**(डॉ. किरणकुमार बोंदर)**
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

**प्रत माहिती व कार्यवाहीस्तव,**

**आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व इयत्तांच्या अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांना तसेच पदविका अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांना याबाबत कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना देण्याच्या आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.**

प्रति - १. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांना माहितीसाठी सादर.
२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.
४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे
६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
७. प्राचार्य, तंत्रनिकेतन व औद्योगिक प्रशिक्षण संस्था.
८. प्राचार्य, वैद्यकिय महाविद्यालये.
९. मा. शिक्षण उपसंचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालय, पुणे १.
१०. मा. शिक्षण उपसंचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालय, नाशिक.